
# १. पाऊस

- गाणे ऐका. म्हणा. कृती करा.
- चित्र पाहा. सांगा. ऐका. चित्रात दाखवा.



आभाळ वाजलं धडाड् धुम्  
वारा सुटला सूं सूं सुम्म्  
वीज चमकली चक् चक् चक्  
जिकडे तिकडे लख् लख् लख्  
पाऊस आला धो धो धो  
पाणी वाह्यलं सो सो सो  
पाण्यात बोट सोडली सोडली  
हातभर जाऊन बुडली बुडली  
बोटीवर बसला बेडुक बेडुक  
तो ओरडला डराँव डुक् डराँव डुक्

– सरिता पदकी

